## राज्यातील हवामान,खरीप हंगाम २०१९ पिक परिस्थिती व रब्बी हंगाम २०१९-२० पिक पेरणी, पिक परिस्थितीचा दिनांक १७/०१/२०२० अखेरचा साप्ताहिक अहवाल

**हवामान व पर्जन्यमान** - राज्यात अहवाल कालावधीत आकाश निरभ्र होते. तपमानात घट झाली आहे. राज्यात बहुतांश विभागात हवामान थंड होते.

**खरीप हंगाम २०१९ पिक परिस्थिती -**

राज्यात कापूस पिकाची तिसरी ते अंतिम वेचणी प्रगतीपथावर आहे. तूर पिक शेंगा भरणे ते शेंगा पक्वतेच्या अवस्थेत असून, काढणी सुरु आहे.

**किड व रोग** - राज्यात काही ठिकाणी तूर पिकावर हेलीकोव्हर्पा, पानाफुलांना जाळी करणारी अळी, शेंगमाशी व शेंगा पोखरणा-या अळींचा प्रादुर्भाव दिसून येत आहे.

कृषि विभागामार्फत किड व रोग नियंत्रणासाठी प्रचार व प्रसिध्दीची कार्यवाही सुरु आहे. राज्यात किड व रोगांवरील उपाययोजना म्हणून शेतीशाळा, कृषि विद्यापिठाकडून पीक संरक्षणाचे दृष्टीने सल्ले, योजनांतर्गत फेरोमेन सापळे व ल्युर्सचा पुरवठा, बाधीत क्षेत्रास तज्ञांच्या भेटी, जनजागृतीसाठी विभागस्तरावर हंगामपूर्व कार्यशाळा, गावबैठका, एसएमएसद्वारे सल्ले इ. उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

दि.१६.०१.२०२० अखेरच्या अवेळी पाऊस व गारपिटीमुळे बाधित झालेल्या क्षेत्राबाबतच्या नजरअंदाजित प्राथमिक अहवालानुसार दि.३१ डिसेंबर,२०१९ ते दि.०३ जानेवारी, २०२० या कालावधीत राज्यात ७१,२६३ हेक्टर क्षेत्र अवेळी पाऊस व गारपिटीमुळे बाधित झाले आहे. बाधित पिकांमध्ये प्रामुख्याने कापूस, तूर, हरभरा, गहू, ज्वारी, संत्रा, मोसंबी, आंबा व भाजीपाला या पिकांचा समावेश आहे.

**रब्बी हंगाम २०१९-२०-** राज्यात रब्बी पिकाखालील सरासरी क्षेत्र ५६.९३ लाख हेक्टर असून दि.१७ जानेवारी, २०२० अखेर ५२.९२ लाख हेक्टर क्षेत्रावर (९२.९५%) पेरणी झाली आहे. ज्वारी पिक पोटरी ते कणसे लागणेच्या अवस्थेत आहे. हरभरा पिक फांदया फुटणे, फुलोरा व काही ठिकाणी घाटे भरणेच्या अवस्थेत आहे. गहू पिक फुटवे फुटणे ते ओंब्या लागणेच्या अवस्थेत आहे. करडई व सुर्यफुल पिक वाढ ते फुलोरा अवस्थेत आहे. तर मका पिक फुलोरा ते कणसे लागणेच्या अवस्थेत आहे. पिकांमध्ये आंतरमशागतीची कामे सुरु आहेत.



**किड व रोग-** राज्यात काही ठिकाणी मका व ज्वारी पिकावर लष्करी अळीचा तर हरभरा पिकावर घाटे अळी व मर या रोगाचा प्रादुर्भाव दिसून येत आहे.

**विभागीय पिक परिस्थिती-**

**कोकण विभाग-**

**हवामान-** अहवाल कालावधीत विभागात आकाश निरभ्र होते. तपमानात घट झाली आहे.

**रबी हंगाम २०१९-२० -** विभागात रब्बी पिकाखालील सरासरी क्षेत्र ०.३० लाख हेक्टर असून दि.१७ जानेवारी, २०२० अखेर ०.२५ लाख हेक्टर क्षेत्रावर (८५%) पेरणी झाली आहे. विभागात खरीप पिकांची कापणी झालेल्या व ओलावा असलेल्या क्षेत्रात पिकांच्या पेरणीची कामे प्रगतीपथावर असून, पिकांमध्ये आंतरमशागतीची कामे सुरु आहेत.

**किड व रोग-** निरंक

**नाशिक विभाग-**

**हवामान-** अहवाल कालावधीत विभागात आकाश निरभ्र होते. दिवसाच्या व रात्रीच्या तपमानात घट झाली आहे.

**खरीप हंगाम २०१९** –विभागात कापूस पिकाची तिसरी/अंतिम वेचणी सुरू आहे. तुर पिक दाणे भरणे ते पक्वतेच्या अवस्थेत असून, काढणी सुरु आहे. इतर पिकांच्या काढण्या पुर्ण झाल्या आहेत.

**किड व रोग-** विभागात तूर पिकावर शेंगा पोखरणाऱ्या अळीचा प्रादुर्भाव दिसून येत आहे.

**रबी हंगाम २०१९-२०**-विभागात रब्बी पिकाखालील सरासरी क्षेत्र ४.३१ लाख हेक्टर असून दि.१७ जानेवारी, २०२० अखेर ४.०१ लाख हेक्टर क्षेत्रावर (९३%) पेरणी झाली आहे. विभागात हरभरा पिक फुलोरा ते दाणे भरणेच्या अवस्थेत आहे. इतर रब्बी पिके वाढीच्या अवस्थेत आहेत. आंतरमशागतीची कामे प्रगतीपथावर आहेत.

**किड व रोग-** विभागात काही ठिकाणी मका व ज्वारी पिकावर लष्करी अळीचा तर हरभरा पिकावर घाटे अळीचा व मर या रोगाचा प्रादुर्भाव दिसून येत आहे.

**पुणे विभाग-**

**हवामान-** अहवाल कालावधीत विभागात आकाश निरभ्र होते. तपमानात घट झाली आहे. हवामान थंड होते.

**खरीप हंगाम २०१९ -** विभागात तूर पिक शेंगा भरणेच्या ते शेंगा पक्वतेच्या अवस्थेत असून, काढणी सुरु आहे. कापूस पिक पक्वतेच्या अवस्थेत असून, वेचणीचे काम चालू आहे.

**किड व रोग-** विभागात कापूस पिकावर शेंदरी बोंड अळीचा प्रादुर्भाव दिसून येत आहे.

**रबी हंगाम २०१९-२०-** विभागात रब्बी पिकाखालील सरासरी क्षेत्र १७.८१ लाख हेक्टर असून दि.१७ जानेवारी, २०२० अखेर ११.४६ लाख हेक्टर क्षेत्रावर (६४%) पेरणी झाली आहे. विभागात गहू व हरभरा पिकांची पेरणीची कामे सुरु आहेत. गहू पिकास पोषक वातावरण निर्माण झाल्याने गहू पिकाची पेरणी प्रगतीपथावर आहे. मका पिक वाढीच्या अवस्थेत आहे. ज्वारी पिक दाणे भरणेच्या अवस्थेत आहे. हरभरा पिक फुलोरा ते घाटे लागणेच्या अवस्थेत आहे. सुर्यफुल पिक फुलोरा अवस्थेत आहे. पुर्व हंगामी ऊस लागवड सुरु आहे. पिक परिस्थिती समाधानकारक आहे.

**किड व रोग-** विभागात काही ठिकाणी मका व ज्वारी पिकावर लष्करी अळीचा तर हरभरा पिकावर घाटे अळी व मर या रोगाचा प्रादुर्भाव दिसून येत आहे.

**कोल्हापूर विभाग-**

**हवामान**- अहवाल कालावधीत विभागात आकाश निरभ्र होते. तपमानात घट झाली आहे.

**खरीप हंगाम २०१९ -** विभागात तुर पिक पक्वतेच्या अवस्थेत असून, काढणी सुरु आहे.

**किड व रोग**-निरंक

**रबी हंगाम २०१९-२०-** विभागात रब्बी पिकाखालील सरासरी क्षेत्र ५.०७ लाख हेक्टर असून दि.१७ जानेवारी, २०२० अखेर ४.२५ लाख हेक्टर क्षेत्रावर (८४%) पेरणी झाली आहे. विभागात गहू पिक फुटवे फुटणे ते कांडी धरणेच्या अवस्थेत आहे. हरभरा पिक घाटे धरणे ते घाटे भरणेच्या अवस्थेत आहे. ज्वारी पिक पोटरी ते फुलोरा अवस्थेत आहे. मका पिक वाढ ते फुलोरा अवस्थेत आहे. करडई पिक फुलोरा अवस्थेत आहे. पुर्व हंगामी ऊस वाढीच्या अवस्थेत तर सुरु ऊस उगवणीच्या अवस्थेत आहे. सुर्यफुल वाढ ते फुलोरा अवस्थेत आहे. रब्बी पिकांमध्ये आंतरमशागतीची कामे सुरु आहेत.

**किड व रोग-** विभागात काही ठिकाणी मका पिकावर लष्करी अळीचा तर हरभरा पिकावर घाटे अळी व मर या रोगाचा प्रादुर्भाव दिसून येत आहे.

**औरंगाबाद विभाग-**

**हवामान**- अहवाल कालावधीत विभागात आकाश निरभ्र होते. तपमानात घट झाली आहे.

**खरीप हंगाम २०१९** - विभागात कापूस पिकाच्या तीसऱ्या वेचणीचे काम प्रगतीपथावर आहे. तूर पिक शेंगा भरणे ते शेंगा पक्वतेच्या अवस्थेत असून, काही ठिकाणी काढणी सुरु आहे.

**किड व रोग-** निरंक.

**रबी हंगाम २०१९-२०-**विभागात रब्बी पिकाखालील सरासरी क्षेत्र ७.७२ लाख हेक्टर असून दि.१७ जानेवारी, २०२० अखेर ८.८४ लाख हेक्टर क्षेत्रावर (११४%) पेरणी झाली आहे. विभागात हरभरा पिक फांदी फुटणे, फुलोरा ते घाटे लागणेच्या अवस्थेत आहे. गहू पिक फुटवे फुटणे, कांडी धरणे ते ओंब्या लागणेच्या अवस्थेत आहे. ज्वारी पिक वाढ, पोटरी ते कणसे लागणेच्या अवस्थेत आहे. मका पिक वाढ ते कणसे लागणेच्या अवस्थेत आहे.

**किड व रोग-** विभागात काही ठिकाणी मका व रब्बी ज्वारी पिकावर लष्करी अळीचा तर हरभरा पिकावर घाटे अळी व मर या रोगाचा प्रादुर्भाव दिसून येत आहे.

**लातूर विभाग-**

**हवामान**- अहवाल कालावधीत विभागात आकाश निरभ्र होते. तपमानात घट झाली आहे.

**खरीप हंगाम २०१९** -विभागात तूर पिक शेंगा पक्वतेच्या अवस्थेत असून, काही ठिकाणी काढणी सुरु आहे. कापूस पिकाची अंतिम वेचणी चालू असून, बऱ्याच ठिकाणी वेचणी पुर्ण झाली आहे.

**किड व रोग-** विभागात काही ठिकाणी तूर पिकावर शेंगा पोखरणाऱ्या अळीचा प्रादुर्भाव दिसून येत आहे.

**रबी हंगाम २०१९-२०-**विभागात रब्बी पिकाखालील सरासरी क्षेत्र ११.१४ लाख हेक्टर असून दि.१७ जानेवारी, २०२० अखेर १३.१४ लाख हेक्टर क्षेत्रावर (११८%) पेरणी झाली आहे. विभागात रब्बी ज्वारी पिक पोटरी ते फुलोरा अवस्थेत आहे. गहू पिक पोटरी ते ओंब्या लागणेच्या अवस्थेत असून, काही ठिकाणी पक्वतेच्या अवस्थेत आहे. हरभरा पिक फुलोरा ते घाटे लागणेच्या तर काही ठिकाणी घाटे पक्वतेच्या अवस्थेत आहे. इतर पिके वाढीच्या अवस्थेत आहेत.

**किड व रोग-** विभागात काही ठिकाणी मका व ज्वारी पिकावर लष्करी अळीचा तर हरभरा पिकावर घाटे अळी व मर या रोगाचा प्रादुर्भाव दिसून येत आहे.

**अमरावती विभाग-**

**हवामान**- अहवाल कालावधीत विभागात आकाश निरभ्र होते. दिवस व रात्रीच्या तपमानात घट झाली आहे.

**खरीप हंगाम २०१९** - विभागात कापूस पिकाची वेचणी अंतिम टप्प्यात आहे. तूर पिक कापणी आणि मळणीची कामे अंतिम टप्प्यात आहे.

**किड व रोग-** विभागात काही ठिकाणी कापूस पिकावर अल्पप्रमाणात गुलाबी बोंड अळीचा तर तूर पिकावर हेलीकोव्हर्पा या किडीचा व शेंगा पोखरणाऱ्या अळीचा प्रादुर्भाव दिसून येत आहे.

**रबी हंगाम २०१९-२०**-विभागात रब्बी पिकाखालील सरासरी क्षेत्र ६.४७ लाख हेक्टर असून दि.१७ जानेवारी, २०२० अखेर ६.९९ लाख हेक्टर क्षेत्रावर (१०८%) पेरणी झाली आहे. विभागात हरभरा पिक फुलोरा ते घाटे लागणेच्या अवस्थेत आहे. गहू पिक ओंब्या लागणेच्या अवस्थेत आहे. पेरणी झालेल्या पिकांची वाढ समाधानकारक असून, पिकांमध्ये आंतरमशागतीची कामे सुरु आहेत.

**किड व रोग-** विभागात काही ठिकाणी हरभरा पिकावर घाटे अळी व मर या रोगाचा प्रादुर्भाव दिसून येत आहे.

**नागपूर विभाग-**

**हवामान**- अहवाल कालावधीत विभागात आकाश निरभ्र होते. हवामान थंड व दमट होते.

**खरीप हंगाम २०१९ -** विभागात तूर पिक शेंगामध्ये दाणे भरणे ते शेंगा पक्वतेच्या अवस्थेत आहे. कापूस पिकाची तीसरी वेचणीची कामे प्रगतीपथावर आहे.

**किड व रोग-** विभागात तुर पिकावर हेलीकोव्हर्पा, पाना फुलांना जाळी करणारी अळी, शेंगमाशी व शेंगा पोखरणारी अळी या किडींचा प्रादुर्भाव दिसून येत आहे.

**रबी हंगाम २०१९-२०**-विभागात रब्बी पिकाखालील सरासरी क्षेत्र ४.१२ लाख हेक्टर असून दि.१७ जानेवारी, २०२० अखेर ३.९६ लाख हेक्टर क्षेत्रावर (९६%) पेरणी झाली आहे. विभागात गहू पिक वाढीच्या ते फुटवे फुटणेच्या अवस्थेत आहे. हरभरा पिक घाटे धरणेच्या अवस्थेत आहेत.

**किड व रोग-** विभागात काही ठिकाणी मका पिकावर लष्करी अळीचा, तर हरभरा पिकावर घाटे अळी व मर या रोगाचा प्रादुर्भाव दिसून येत आहे.

महाराष्ट्र राज्यातील रब्बी हंगाम २०१९-२० मुख्य पिकाखालील दि. १७-०१-२०२० पर्यंतचा पेरणीचा साप्ताहीक प्रगती अहवाल.

(क्षेत्र हेक्टर मध्ये)

| अ.क्र. | पिके | सरासरी क्षेत्र (१२-१३ ते १६-१७) | मागिल वर्षाची पेरणी दि १८/०१/२०१९ | प्रत्यक्ष पेरलेले क्षेत्र | पेरलेल्या क्षेत्राची सरासरी क्षेत्राशी टक्केवारी | पेरलेल्या क्षेत्राची मागिल वर्षाशी टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | रब्बी ज्वारी | २६७८५१३ | १२४६६८६ | १७९५२५९ | ६७ | १४४ |
| २ | गहू | १०१४८०४ | ५५७७१३ | १००४६६२ | ९९ | १८० |
| ३ | मका | २२५२६० | ११५९०२ | २१८७८५ | ९७ | १८९ |
| ४ | इतर रब्बी. तृणधान्ये | १२४६२ | १२५२४ | ७४४२ | ६० | ५९ |
| | **एकूण रब्बी. तृणधान्ये** | **३९३१०३९** | **१९३२८२५** | **३०२६१४७** | **७७** | **१५७** |
| ५ | हरभरा | १४९०२४७ | १२९३९८० | २११३८४७ | १४२ | १६३ |
| ६ | इतर रब्बी. कडधान्ये | १०९९८६ | १०५९२७ | १११५६८ | १०१ | १०५ |
| | **एकूण रब्बी कडधान्ये** | **१६००२३३** | **१३९९९०७** | **२२२५४१५** | **१३९** | **१५९** |
| | **एकूण रब्बी अन्नधान्ये** | **५५३१२७१** | **३३३२७३२** | **५२५१५६२** | **९५** | **१५८** |
| ७ | करडई | ८७६०४ | १७९७३ | २२५८६ | २६ | १२६ |
| ८ | जवस | २१५०४ | ७२९४ | ८४३१ | ३९ | ११६ |
| ९ | तीळ | १४५२ | ५१८ | ८३३ | ५७ | १६१ |
| १० | सुर्यफुल | ४१६३२ | ३४६३ | २४६६ | ६ | ७१ |
| ११ | इतर रब्बी तेलबीया | ९६०१ | ५३३१ | ५९४८ | ६२ | ११२ |
| | **एकूण रब्बी तेलबीया** | **१६१७९३** | **३४५७८** | **४०२६४** | **२५** | **११६** |
| | **राज्यातील एकूण पीकाखालील पेरणीचे क्षेत्र** | **५६९३०६५** | **३३६७३१०** | **५२९१८२६** | **९२.९५** | **१५७** |

टिप - पेरणी क्षेत्र नजर अंदाजित